भारतीय पृथ्वि विज्ञान मंत्रालय, भारतीय हवामान शास्त्र विभाग आणि
डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली सहयोगीत

# -: ग्रामिण कृषि मौसम सेवा प्रकल्प :-

उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग

## हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला पत्रक - सिंधुदुर्ग

कालावधी (दिनांक २६.०६.२०१९ ते ३०.०६.२०१९)

| अंक ५१/२०१९ | दिनांक २५.०६.२०१९ | कालावधी ५ दिवस |
|---|---|---|

| मागील आठवड्यातील हवामान घटकांची प्रत्यक्ष नोंद (१९/०६/२०१९ ते २५/०६/२०१९ पर्यंत) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचे हवामान घटकांचे पुर्वानुमान (वैधता २६/०६/२०१९ ते ३०/०६/२०१९ पर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १९/०६ | २०/०६ | २१/०६ | २२/०६ | २३/०६ | २४/०६ | २५/०६ | दिनांक | २६/०६ | २७/०६ | २८/०६ | २९/०६ | ३०/०६ |
| ६.६ | ६७.० | १.४ | ०.० | ५.२ | १८.४ | ०.० | पाऊस (मि. मी) | ४५ | ६१ | ३५ | ४५ | ६७ |
| ३१.५ | ३१.५ | २७.५ | ३२.५ | ३२.५ | ३२.५ | ३१.० | कमाल तापमान (अं. से) | ३२ | ३१ | ३२ | ३२ | ३२ |
| २५.० | २३.० | २३.० | २३.० | २३.० | २४.० | २४.० | किमान तापमान (अं. से) | २३ | २३ | २३ | २३ | २३ |
| ढगाळ | ढगाळ | निरभ्र | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | सकाळ — मेघाच्छादन (ऑक्टा.) | ४ | ७ | ६ | ७ | ८ |
| ढगाळ | ढगाळ | निरभ्र | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | दुपार | | | | | |
| ९२ | ८५ | ८५ | ८५ | ९२ | ९२ | ९० | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ८८ | ९० | ९० | ९० | ९० |
| ७२ | ८६ | ६६ | ७२ | ७२ | ८६ | ६६ | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ६६ | ७२ | ७६ | ७९ | ८४ |
| ०.९ | ०.७ | ०.७ | २.१ | १.४ | ३.१ | १.९ | वा-याचा वेग (कि.मी/तास) | ००९ | ०१० | ०१३ | ०१४ | ०१३ |
| स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | नैऋत्ये | स्थिर | सकाळ — वा-याची दिशा | नैऋत्ये कडून | पश्चिमे कडून | पश्चिमे कडून | पश्चिमे कडून | पश्चिमे कडून |
| दक्षिणे | दक्षिणे | दक्षिणे | दक्षिणे | नैऋत्ये | नैऋत्ये | दक्षिणे | दुपार | | | | | |

| मागील वर्षातील (२०१८) पर्जन्य (मि. मी) | १/०१/२०१९ पासुनचे पर्जन्य (मि. मी) | १/०६/२०१९ पासुनचे पर्जन्य (मि. मी) | मागील आठवड्यातील पर्जन्य (मि.मी) |
|---|---|---|---|
| ३२६९.२ | २५२.८ | २५२.८ | ९८.६ |

**पुढील ५ दिवसाच्या हवामानाची सामान्य स्थिती:** येत्या ५ दिवसात जिल्हयात मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे.

## हवामान पुर्वानुमान कृषि सल्ला

| पिकाचे नाव | पिकाची अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| भात, नागली | पुर्नलागवड | या आठवड्यात जोरदार पाऊस पडण्याची शक्यता आहे. काही ठिकाणी भात पिक २० ते २५ दिवसांच्या रोपांच्या अवस्थेत आहे. शेतक-यांनी पुर्नलागवडीची कामे हाती घ्यावीत व ती लवकरात लवकर पुर्ण करावीत. पुर्नलागवडीसाठी रोपे १० ते १५ सेमी ऊंचीची, ५-६ पाने फुटलेली व २०-२२ दिवसांची असावीत. शेवटच्या चिखलणीच्यावेळी प्रती गुंठा क्षेत्रास ८७० ग्रम युरीया, ३ किलो सिंगल सुपर फॉस्फेट व ८३० ग्रम म्युरेट ऑफ पोटॅश या प्रमाणात खते द्यावीत. हिरवळीच्या खतासाठी गिरीपुष्पाचा पाला हेक्टरी १० टन याप्रमाणे (१०० किलो प्रती गुंठा) लावणीपुर्वी शेतात गाडल्यास नत्राच्या मात्रेत बचत करता येते. भाताची लावणी जमिनीच्या मगदुरानुसार हळव्या जातींसाठी १५ x १५ सेमी (४४ चुडे प्रती चौ.मी.) आणि निमगरव्या व गरव्या जातींसाठी २० x १५ सेमी (३३ चुडे प्रती चौ.मी.) अंतर ठेवावे. लावणी सरळ व ऊथळ करावी. संकरीत भातासाठी एकाठिकाणी एकच जोमदार रोप लावावे. भात लागवडीसाठी चारसुत्री लागवड पद्धतीचा अवलंब करावा. भात खाचरात मोठ्या प्रमाणात पाणी साचुन राहिल्यास अतिरीक्त पाण्याचा निचरा करावा.<br>काही ठिकाणी भात पिक १५ ते २० दिवसांच्या रोपांच्या अवस्थेत आहे. अश्या ठिकाणी शेतक-यांनी पुर्नलागवड करण्यासाठी शेतामध्ये नांगरणी व चिखलणी करण्यास सुरुवात करावी. त्यासाठी विद्यापीठाने विकसीत केलेल्या पंकज चिखलणी यंत्राचा वापर करावा.<br>नागलीच्या रोपवाटीकेतील रोपे १५ दिवसांची झाली असल्यास रोपवाटीकेमधील तणांची बेणणी करुन युरीया या नत्रयुक्त खताचा गुंठ्यास १ किलो या प्रमाणे वापर करावा. तसेच लागवड करावयाच्या ठिकाणी ऊतारास आडवी पुर्व मशागत करावी. |
| भुईमुग | पुर्व मशागत व पेरणी | पावसाचा अंदाज घेवुन भुईमुग लागवडीसाठी शेताच्या पुर्वतयारीची कामे हाती घ्यावीत. त्यासाठी जमिन खोल नांगरुन भुसभुशीत करावी व शेवटच्या कुळवणीपुर्वी हेक्टरी १० टन चांगले शेणखत किंवा कंपोस्ट मिसळावे. डॉ. बा. सा. कोकण कृषि विद्यापीठाने शिफारस केलेल्या कोकण गौरव व ट्रॉम्बे कोकण (टपोरा) तसेच टी.जी.२६, टी.ए.जी. २४, टी.पी.जी. ४१ या जातींची निवड करावी. प्रती हेक्टरी १०० ते १२५ किलो बियाणे वापरावे. मर रोगाचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी थायरम ३ ग्रॅम/किलो या प्रमाणात चोळावे. |
| आंबा | नवीन लागवड | फळ पीकांसाठी आवश्यक असणा-या सेंद्रिय व रासायनिक खताचे नियोजन करुन खताची उपलब्धता करुन ठेवावी. डॉ. बा. सा. कोकण कृषी विद्यापीठाने शिफारस केल्याप्रमाणे एक वर्ष वयाच्या आंबा कलमांना १ घमेले शेणखत, ३०० ग्रम युरिया, ३०० ग्रम सिंगल सुपर फॉस्फेट आणि १०० ग्रम म्युरेट ऑफ पोटॅश या प्रमाणे खते द्यावीत. ही खताची मात्रा झाडाच्या वयोमानानुसार दोन वर्षे वयाच्या झाडांना दुप्पट, तीन वर्षे वयाच्या झाडांना तिप्पट या प्रमाणे १० वर्षे वाढवावी. १० वर्ष व त्यापुढिल झाडांना १० घमेले शेणखत, ३ किलो युरिया, ३ किलो सिंगल सुपर फॉस्फेट आणि १ किलो म्युरेट ऑफ पोटॅश या प्रमाणे खते द्यावीत.<br>आंबा रोपवाटीकेत रुजलेल्या आंबा बाट्यावर कलमे बांधण्याची प्रक्रिया सुरु करावी. |
| काजु | नवीन लागवड | काजुवर खोडकिडा (रोठा) या किडिचा प्रादुर्भाव आढळुन आल्यास १५ मि.मी. पटाशिच्या सहाय्याने प्रादुर्भित साल काढून झाडातील रोठ्याला बाहेर काढून मारुन टाकावे व तो भाग २०% प्रवाही क्लोरोपायरीफॉस ५० मी.लि. १० लिटर पाण्यामध्ये मिसळून चांगला भिजवावा. काजुमध्ये काढणीनंतर जुन्या व रोगट फांद्या कापून त्या ठिकाणी १% बोर्डोमिश्रन लावावे. |
| नारळ | फळधारणा | नारळावरील गेंड्या भुंगा या किडीच्या नियंत्रणासाठी प्रादुर्भावग्रस्त माड साफ करुन सर्वात वरील पानांच्या बेचक्यात २% मिथील पॅराथिऑन पावडर ५० ग्रम + ५० ग्रम वाळु यांचे समप्रमाणात मिश्रण करुन भरावे. बागेमध्ये शेणखताच्या खड्यात अळ्यांना मारण्यासाठी ५०% कार्बारिल भुकटी ४० ग्रम प्रति १० लि. पाण्यात मिसळुन फवारावी. |
| भाजीपाला | रोपवाटीका व्यवस्थापन व पेरणी | भाजीपाला पीकांमध्ये मिरची, वांगी, टोमॅटो, भेंडी, काकडी, कारली, पडवळ, चिबुड, शिराळी ई. पीकांची लागवड करण्यास योग्य हवामान असुन पाऊसाचा अंदाज पाहुन पेरणी करावी. तसेच पेरणीसाठी सुधारीत जातीचे बियाणे वापरावे. भेंडीची लागवड सरी-वरंब्यावर करावी. वेलवर्गीय भाजीपाला पीकांसाठी मातीचे ऊंचवटे करुन त्यावर मध्यभागी लागवड करावी. |

सदर कृषि सल्ला पत्रिका ही डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठाच्या, प्रादेशीक फळ संशोधन केंद्र, वेंगुर्ले व उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे येथील "ग्रामीण कृषि मौसम सेवा" योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशी वरुन तयार करुन प्रकाशित करण्यात आली.

डॉ. प्रदिप चं. हळदवणेकर
सहयोगी अधिष्ठाता
उदयानविद्या महाविद्यालय, मुळदे
ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग

डॉ. बळवंत ना. सावंत
सहयोगी संशोधन संचालक/नोडल ऑफिसर
(ग्रामिण कृषि मौसम सेवा)
प्रा.फ.सं.के. वेंगुर्ले, जि. सिंधुदुर्ग
(०२३६६-२६२२३४, २६२६९३)

डॉ. यशवंत चं. मुठाळ
तांत्रिक अधिकारी
ग्रामिण कृषि मौसम सेवा
उदयानविद्या महाविद्यालय, मुळदे
(०२३६२-२४४२३१)